# वसई-विरार शहर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "घरो घरी तिरंगा" / "हर घर तिरंगा" उपक्रम

भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होत आहेत. या संदर्भात केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाने जनतेच्या मनामध्ये स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी मनात रहावी व त्यांचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक 13 ऑगस्ट, 2022 ते 15 ऑगस्ट, 2022 या कालावधीमध्ये देशभरात "घरो घरी तिरंगा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका दिनांक 13 ऑगस्ट, 2022 ते 15 ऑगस्ट, 2022 या कालावधी मध्ये "घरो घरी तिरंगा" हा उपक्रम राबविणार आहे. हया अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील नागरिकांना मोफत तिरंगा झेंडयाचे वाटप करण्यात येणार आहे.

<u>तिरंगा झेंडयाचे स्वरुप खालील प्रमाणे असावे :-</u>

1. तिरंगा झेंडयाचा आकार आयाताकार असावा
2. तिरंगा झेंडयाची लांबी व रुंदी यांचे प्रमाण 3:2 असे असावे.
3. केंद्रीय गृह विभाग यांच्या दिनांक 30 डिसेंबर, 2021 रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज़ संहिता 2002 मधील परिच्छेद 1.2 मधील तरतूदीनुसार राष्ट्रध्वज़ हे हाताने काढलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनव्दारे तयार केलेल्या सूती पॉलिस्ट्र / लोकर / सिल्क़ / खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असे निर्देश आहेत.
4. तिरंगा झेंडयामध्ये सर्वात वर केशरी, मध्यभागी पांढरा व खाली हिरवा रंग असा क्रम असतो.
5. तिरंगा झेंडयाच्या मध्यभागातील पांढ-या पट्टीवर 24 रेषा (आरे) असलेले गोलाकार निळया रंगाचे अशोकचक्र असते.

<u>तिरंगा झेंडयाच्या सन्मानाबाबतचे नियम :-</u>

1. तिरंगा झेंडा फडकवितांना केशरी रंग हा वरच्या बाजूस असावा.
2. घरोघरी तिरंगा उपक्रमातंर्गत दिनांक 13 ऑगस्ट़ ते 15 ऑगस्ट़ 2022 हया तीन दिवशी घरोघरी तिरंगा फडकवितांना दररोज संध्याकाळी झेंडा उतरावयाची आवश्यक़ता नाही. नागरिकांना तसेच कार्यालयांना यासंबंधी भारतीय ध्वज़ संहिता पाळावी लागेल.
3. उपक्रम कालावधीनंतर झेंडा फेकू नये, सदरचा झेंडा वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयाकडे जमा करावा.
4. अर्धा कुजलेला, फाटलेला, कापलेला झेंडा कोणत्याही परिस्थितीमध्ये फडकवू नये. सदरचा झेंडा वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयाकडे जमा करावा.
5. या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांशी संपर्क करावा. सर्व नागरीकांनी <u>www.vvcmcharghartiranga.in</u> या संकेतस्थळाला भेट देऊन नाव नोंदणी करावी
6. सर्व नागरिकांनी तिरंगा ध्वजासोबतचे छायाचित्र (सेल्फी) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या (http://www.facebook.com/vvcmc/ फेसबुक पेज आणि ट्विटर अकाउंट <u>http://mobile.twitter.com/vasaivirarmcorp</u> ला जोडावे.

"घरोघरी तिरंगा महान, माझा तिरंगा माझी शान"

<u>आपला विनीत</u>

**श्री अनिलकुमार पवार**

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार (पूर्व)**